RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६९] मंगळवार, ऑगस्ट १८, २०२६/श्रावण २७, शके १९४८ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सक्षम प्रधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसई यांजकडून

**मौजे नागले ता. वसई ४० मीटर रुंद गायमुख ते पायेगाव खाडीपूलाच्या प्रकल्पासाठी "भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम १९ पोट-कलम (१)**

**अधिसूचना**

क्रमांक व्हीडी/ भूसंपादन/ मौजे नागले/ खाडीपूल/ कलम-१९-१/कावि १२/२०२६.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना जा.क्र. क्रमांक/व्हीडी/ भूसंपादन/मौजे नागले/ कावि-०५/२०२६ दिनांक ७ मे २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलावर वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलावर विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, वसई तालुक्याचे, सक्षम प्राधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुंटुबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्स्थापना योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन, असलेला जिल्हाधिकारी, यांनी उक्त अधिनियमांखाली, जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी वसई तालुक्याकरिता उप विभागीय अधिकारी, वसई यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची एक
## जमिनीचे वर्णन
## मौजे नागले, ता. वसई, जि. पालघर येथील संपादित करावयाच्या जमिनीचा तपशील

| अ.क्र. | स.नं/हि.नं. | ७/१२ सदरी क्षेत्र | संपादित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | १२/अ/प्लॉट नं.१ | ०.८१.०० | ०.७३.७१ |
| | १२/अ/प्लॉट नं.२ | ०.५३.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.४ | १.६२.०० | |
| | १२/अ/४/३ | ०.१४.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.५ | १.६२.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.६ | ०.०४.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.७ | १.६२.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.८ | ०.०६.०० | |
| | १२/अ/प्लॉट नं.१४ | ०.०६.०० | |
| | १२/ब/१ | १०.७९.३० | |
| २ | १२/ब | ०.३६.४० | ०.१५.१३ |
| ३ | ३८/१/१ | ०.२७.४० | ०.०६.५६ |
| | ३८/१/२ | ०.६८.०० | |
| | ३८/२/१ | ०.७५.५० | |
| | ३८/२/२ | ०.०४.५० | |
| | ३८/३ | ०.७६.०० | |
| | ३८/४/१ | ०.४५.०० | |
| | ३८/४/२ | ०.१३.०० | |
| | ३८/५ | १.१०.०० | |
| | ३८/६/१ | ०.१९.४० | |
| | ३८/६/२ | ०.०२.५० | |
| ४ | ८६/१ | ०.५२.७० | ०.१५.९२ |
| | ८६/२ | २.८०.८० | |
| | ८६/३ | ०.५९.५० | |
| ५ | ८८/१ | ३.४१.८० | ०.३९.५० |
| | ८८/२ | ०.३३.०० | |
| ६ | ८९/१ | ०.५३.०० | ०.०६.६९ |
| | ८९/२ | ०.२६.८० | |
| | ८९/३ | ०.०६.६० | |
| | ८९/४ | ०.२१.२० | |
| | ८९/५ | ०.१३.४० | |
| | ८९/६ | १.७३.२० | |
| ७ | ९०/१ | ०.०५.०० | ०.२६.७५ |
| | ९०/१/५/१ | २.१८.५० | |
| | ९०/२ | ०.२३.०० | |
| | ९०/३ | ०.४२.५० | |
| | ९०/४ | ०.३०.०० | |
| | ९०/५ | ३.०६.०० | |
| | ९०/६ | ०.४०.०० | |
| | एकूण | | १.८४.२६ |

**अनुसूची दोन**

| सार्वजनीक प्रयोजन स्वरुपात विवरण | |
|---|---|
| **प्रकल्पांचे नाव** | मौजे नागले ता. वसई ४० मीटर रुंद गायमुख ते पायेगाव खाडीपूल |
| **प्रकल्पाचे वर्णन** | सदरहू रस्ता व खाडीपूल हा ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदरपाडा येथे असलेल्या घोडबंदर रस्त्यास जोडण्यात येणार आहे. |
| **समजाला मिळणारे लाभ** | मौजे नागले या व परिसरातील गावे उक्त प्रकल्पामुळे ठाणे महानगरपालिका क्षेत्राशी जोडले जाऊन महापालिका क्षेत्रामधील सोईसुविधा लाभ नागरीकांस उपलब्ध होईल. तसेच प्रादेशिक वाहतुकीचे बळकटी करण या प्रकल्पामुळे होणार असल्यामळे सामाजिक उन्नती या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होईल. |

**अनुसूची तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे- विस्थापित होत नाहीत कारणे निरंक.**

**अनुसूची चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणांचा सारांश - निरंक.**

(सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास संस्थेद्वारे दिलेल्या माहितीनुसार)

**अनुसूची पाच**

| | | |
|---|---|---|
| अ | **प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम** | सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वसई |
| ब | **प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता** | श्रीप्रस्था, नालासोपरा-विरार लिंक रोड, एच पी पेट्रोल पंपाच्यापूढे, निळेमोरे, नालासोपारा(प.), ता. वसई, जि. पालघर पिन -४०१२०३ |
| क | **ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील** | मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील पत्र क्र. भुसंपादन/कक्ष-१/टे-१कावि-१३५७/२०२५ दिनांक ०४/०८/२०२५ |

**शेखर घाडगे,**
सक्षम प्राधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वसई.

**डॉ. इंदुराणी जाखड,**
जिल्हाधिकारी, पालघर.

ठिकाण वसई,
दिनांक १८ ऑगस्ट २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.